# मेट्रो-३ची मरोळ, मरोशी येथे चाचणी

## आठ डब्यांची रेल्वे सज्ज; कारशेडचा वाद असतानाही प्रकल्पपूर्तीचे प्रयत्न

मुंबई, ता. ३० : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गाच्या कारशेडचा पेच अद्याप सुटलेला नाही. हा पेच कायम असतानाच मेट्रो रेल्वे डब्यांची मरोळ, मरोशी येथे चाचणी करण्यात येणार आहे. 'अल्स्टॉम' या कंपनीने श्रीसिटी आंध्रप्रदेश येथे ८ डब्यांची ट्रेन तयार केली असून, ती मुंबईत लवकरच दाखल होणार आहे. ही ट्रेन दाखल होताच चाचण्यांना सुरुवात होणार आहे.

मेट्रो-३ च्या कारशेडचा वाद सुरू असताना मेट्रो-३ प्रकल्प प्रवाशांच्या सेवेत आणण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने प्रयत्न सुरू केले आहेत. अल्स्टॉम या कंपनीने तयार केलेल्या ८ डब्यांच्या ट्रेनची तांत्रिक चाचणी झाली आहे. प्रत्यक्षात या ट्रेनची मुंबईमध्ये १० हजार किलोमीटर चालवून चाचणी घेण्यात येणार आहे. त्यानंतर कुलाबा ते सीप्झ या मार्गिकेवर देखील ही ट्रेन चालविण्यात येणार आहे. या चाचण्या यशस्वी झाल्यानंतर अशा पद्धतीच्या ३१ ट्रेन या मार्गावर उपलब्ध होणार आहेत. आरेतील एकाही वृक्षाला धक्का न लागू देता चाचण्या पूर्ण करण्याची सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे.



### १७ टक्के भुयारीकरण पूर्ण

सध्या मरोळ मरोशी या भुयारी मार्गाचे काम चालू असून या च्या जवळच रॅम्प बनवून काम हाती घेण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या चाचणीच्या कामाकरिता कोणतेही झाड तोडण्यात येणार नाही. तात्पुरती सेवा उभारण्यासाठी सरकारने दिलेल्या परवानगीमुळे प्रकल्पास अधिक चालना मिळेल. सद्यस्थितीत प्रकल्पाचे ९७ टक्के भुयारीकरण व जवळपास ७० टक्के स्थापत्य कामे पूर्ण झाली आहेत.